**आजचे पंचांग**

दिनांक : २७ जुलै २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : त्रयोदशी तिथी (दुपारी ०४:१४ पर्यंत) त्यानंतर चतुर्दशी तिथी नक्षत्र : मूळ नक्षत्र (सकाळी १०:२८ पर्यंत) त्यानंतर पूर्वाषाढा नक्षत्र योग : वैधृति योग (रात्री १०:५४ पर्यंत) त्यानंतर विष्कुम्भ योग करण : तैतुला करण (दुपारी ०४:१४ पर्यंत)

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


**'विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज अन् पेलेट गनचा आदेश कोणी दिला?'**

**पुणे :** ; दिल्लीत पारदर्शक शिक्षण व्यवस्थेच्या मागणीसाठी आंदोलनाला बसलेल्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्ज कारवाईवरून देशातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याप्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून प्रश्न विचारले आहेत. २० जुलै रोजी झालेल्या या घटनेबाबत उत्तर देण्याची मागणी करत राहुल गांधींनी गृहमंत्रालयाला दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. याबाबतचे त्यांनी पत्र सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केले आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. २७ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २९९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना 'शिक्षणमहर्षी' पुरस्कार जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : जनमंथन वृत्तसेवा**

शिक्षण क्षेत्रात दूरदृष्टी, सामाजिक बांधिलकी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना राष्ट्रीय श्रमिक आघाडी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'शिक्षणमहर्षी' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शनिवार, दि. २१ जुलै २०२६ रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी येथे आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी आज (दि. २४) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी बोलताना यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. हीच भूमिका स्वीकारत डॉ. पी. डी. पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. विशेषतः कामगार, शेतकरी, ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण संस्थांनी गुणवत्ता, संशोधन, कौशल्य विकास आणि आधुनिक शिक्षणपद्धती यांचा प्रभावी संगम साधला आहे. डॉ. पी. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली डी. वाय. पाटील विद्यापीठाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, वैद्यकीय शिक्षण, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कृषी, जैवतंत्रज्ञान तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, आधुनिक पायाभूत सुविधा, संशोधनाला चालना आणि सामाजिक उत्तरदायित्व या मूल्यांमुळे संस्थेने देशभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याबाबत डॉ. पाटील यांनी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली असून, शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या या बहुमोल कार्याची दखल घेत राष्ट्रीय श्रमिक आघाडीने त्यांना 'शिक्षणमहर्षी' पुरस्काराने गौरविण्याचा निर्णय घेतल्याचे भोसले यांनी सांगितले. हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून, शिक्षण क्षेत्रात निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षणसेवकांचा सन्मान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सन्मानामुळे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेकांना प्रेरणा मिळेल, असा विश्वासही यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केला.

# दोनदा राजीनामा देण्याची तयारी, पण महिनाभर थांबवले का?

## धर्मेंद्र प्रधान प्रकरणावर सरकारच्या भूमिकेवर नवे प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात उसळलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दोन वेळा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली होती, मात्र केंद्र सरकारने तो स्वीकारण्यास नकार दिल्याची माहिती सरकारी सूत्रांकडून समोर आली आहे. या दाव्यामुळे सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर आणि आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीवर नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, आंदोलनाच्या सुरुवातीलाच धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत पदत्यागाची तयारी दर्शवली होती. त्यानंतर २० जुलै रोजी झालेल्या वरिष्ठ मंत्र्यांच्या उच्चस्तरीय बैठकीत त्यांनी पुन्हा एकदा राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र दोन्ही वेळा पक्ष नेतृत्वाने त्यांना थांबण्यास सांगितले. सरकारचा युक्तिवाद असा होता की, केवळ मंत्र्याचा राजीनामा हा समस्येवरचा उपाय नसून शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे अधिक महत्त्वाचे आहे.

दरम्यान, मध्य प्रदेशचे कॅबिनेट मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते कैलाश विजयवर्गीय यांनीही दावा केला की, विद्यार्थी आंदोलन सुरू होताच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनाम्याची तयारी दर्शवली होती. मात्र पक्ष नेतृत्वाने अंतिम निर्णय होईपर्यंत त्यांना थांबण्याचे निर्देश दिले. विजयवर्गीय यांनी असा दावाही केला की, प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे भारतात अस्थिरता निर्माण करण्याचा



प्रयत्न करणाऱ्या परकीय शक्तींचे डाव उधळले गेले.

मात्र या सर्व घडामोडींमुळे काही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. जर सरकारला सुरुवातीपासूनच राजीनाम्याची ऑफर माहिती होती, तर तो स्वीकारण्यासाठी जवळपास महिनाभर का लागला? विद्यार्थी आंदोलन देशभर तीव्र होत असताना, पोलिस कारवाईत विद्यार्थी जखमी होत असताना आणि शैक्षणिक वातावरण ढवळून निघत असताना सरकारने तत्काळ राजकीय जबाबदारी निश्चित का केली नाही, असा प्रश्न विरोधकांसह अनेक विद्यार्थी संघटनांकडून उपस्थित केला जात आहे.

सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, सरकारचे मत कॉकरोच जनता पार्टीसोबत झालेल्या चर्चेच्या दुसऱ्या फेरीनंतर बदलले. २० जुलैच्या चलो संसद आंदोलनानंतर आणखी मोठ्या आंदोलनाची घोषणा करण्यात आल्याने केंद्राने परिस्थितीचा फेरआढावा घेतला.

त्याचवेळी सुरक्षा यंत्रणांनी देशद्रोही घटक आंदोलनाचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा अहवाल दिल्याचा दावा करण्यात आला. डिजिटल पाळत ठेवण्याच्या यंत्रणेला ४०० हून अधिक संशयास्पद सोशल मीडिया खाती आढळल्याचे, त्यापैकी सुमारे १०० इन्स्टाग्राम खाती पाकिस्तानमधून चालवली जात असल्याचा दावाही सूत्रांनी केला आहे. या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पडताळणी अद्याप झालेली नाही.

अखेरीस, जंतर-मंतर परिसरातील तणाव कमी करण्यासाठी आणि आंदोलनाची तीव्रता आटोक्यात आणण्यासाठी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा मंजूर केल्यानंतर केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला.

या संपूर्ण प्रकरणामुळे केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा प्रश्न उरत नाही, तर संकटाच्या काळात सरकारची निर्णयक्षमता, नैतिक जबाबदारी आणि वेळेवर प्रतिसाद देण्याची तयारी याविषयीही व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

## कारगिलच्या शौर्याला पंतप्रधान मोदींचा सलाम; 'मन की बात'मधून जवानांच्या बलिदानाला अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

कारगिल विजय दिवस प्रत्येक भारतीयासाठी अभिमान आणि शौर्याची प्रेरणा देणारा दिवस असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या १३६व्या भागातून कारगिल युद्धातील शहीद जवानांना भावपूर्ण आदरांजली वाहिली. कारगिलच्या वीरांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले असून त्यांचे शौर्य देशाला सदैव प्रेरणा देत राहील, असे ते म्हणाले.

२६ जुलै ही अशी तारीख आहे की ती लक्षात ठेवण्यासाठी कॅलेंडर पाहण्याची गरज नसते, असे सांगत पंतप्रधानांनी कारगिल विजय दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले. नव्या पिढीला कारगिलच्या शौर्यगाथांची ओळख व्हावी यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'विशेष शौर्य विजय यात्रे'चाही त्यांनी उल्लेख केला.

दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकापासून सुरू झालेली ही यात्रा द्रास येथील कारगिल वॉर मेमोरियलपर्यंत पोहोचणार असून, वन राइड, वन नेशन, वन सॅल्यूट हा तिचा संदेश असल्याचे त्यांनी सांगितले.



देशाची संरक्षण क्षमता सातत्याने बळकट होत असल्याचे सांगताना पंतप्रधानांनी भारतीय नौदलातील स्वदेशी युद्धनौका आयएनएस महेंद्रगिरी, तसेच डीआरडीओने यशस्वीरीत्या चाचणी घेतलेल्या पिनाका लाँग रेंज गाइडेड रॉकेट आणि कुशा क्षेपणास्त्र प्रणालीचा उल्लेख केला.

संरक्षण उत्पादन, निर्यात आणि मित्रदेशांसोबतचे सहकार्य यामध्ये भारत नव्या उंचीवर पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय, 'कॅच द रेन' अभियानाअंतर्गत जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचे आवाहन करत त्यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरातील जलस्रोतांच्या संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. आज वाचवलेला प्रत्येक थेंब भविष्यातील पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा आहे, असा संदेशही त्यांनी देशवासीयांना दिला.

## 'पेपरफुटी ही केवळ ठिणगी; तरुणांच्या संतापामागे शिक्षणाचा वाढता खर्च आणि संधींची टंचाई' : काँग्रेसचा केंद्रावर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

नीट पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरात उभ्या राहिलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. पेपरफुटी हा केवळ तात्कालिक मुद्दा असला, तरी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या संतापामागे शिक्षणाची वाढती महागाई, संधींची कमतरता आणि परवडणाऱ्या शिक्षणाचा अभाव ही मूळ कारणे असल्याचा आरोप काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला.

जयराम रमेश यांनी घरगुती खर्चाच्या आकडेवारीचा हवाला देत म्हटले की, अलीकडील जंतर-मंतरसह देशभरातील आंदोलनांचा केंद्रबिंदू पेपरफुटी असला, तरी त्यामागील खरी वेदना शिक्षण अधिकाधिक महाग आणि सामान्य कुटुंबांच्या आवाक्याबाहेर जात असल्याची आहे. देशातील तरुण आणि त्यांचे पालक सरकारकडून केवळ आश्वासने नव्हे, तर शिक्षण अधिक सुलभ आणि परवडणारे करण्यासाठी ठोस उपाययोजनांची अपेक्षा करत आहेत, असे त्यांनी म्हटले. काँग्रेसच्या मते, गेल्या काही वर्षांत स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता, परीक्षा रद्द होणे, निकालातील विलंब आणि वाढत्या शैक्षणिक खर्चामुळे विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. अशा परिस्थितीत सरकारने केवळ घटनांवर प्रतिक्रिया देण्याऐवजी शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत त्रुटी दूर करण्यासाठी व्यापक सुधारणा करणे आवश्यक असल्याचा पक्षाचा आग्रह आहे. दरम्यान, केंद्र सरकारने पेपरफुटी रोखण्यासाठी आणि परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठी विविध सुधारणा सुरू असल्याचा दावा केला आहे. मात्र विरोधकांचा आरोप आहे की, प्रश्नपत्रिका गळतीसारख्या घटनांवर तात्पुरती कारवाई करून मूळ समस्या सुटणार नाही. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर दीर्घकालीन धोरण, उत्तरदायित्व आणि परवडणाऱ्या शिक्षणाची हमी देणे हीच काळाची गरज असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. नीट प्रकरणानंतर सुरू झालेल्या या राजकीय संघर्षात शिक्षण व्यवस्था, युवकांचे भविष्य आणि सरकारची उत्तरदायित्वाची भूमिका हेच आता राष्ट्रीय चर्चेचे केंद्रबिंदू ठरत आहेत.

## ऊन जीव घेतंय, कायदा मात्र गप्प!; उष्णतेला 'व्यावसायिक धोका'चा दर्जा नाही, लाखो कामगार मृत्यूच्या छायेत

### कंपन्यांसाठी सक्तीचे नियम नाहीत; सरकारच्या मार्गदर्शक सूचना केवळ कागदावर, २०३० पर्यंत GDP ला ४.५ टक्क्यांचा फटका बसण्याचा इशारा

**विशेष प्रतिनिधी**

देशभरात दरवर्षी विक्रमी तापमानाची नोंद होत असताना आणि उष्णतेमुळे मृत्यू व आजारांच्या घटना वाढत असतानाही भारतातील कामगार कायद्यात 'उष्णतेची लाट' (Heat Wave) अद्याप अधिकृत 'व्यावसायिक धोका' (Occupational Hazard) म्हणून मान्यच करण्यात आलेली नाही. परिणामी, भर उन्हात राबणाऱ्या लाखो बांधकाम, शेती, रस्ते आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या जीविताची जबाबदारी नेमकी कोणाची, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाकडून उन्हाळ्यात केवळ मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातात. मात्र, या सूचनांचे पालन न करणाऱ्या कंपन्या किंवा ठेकेदारांवर कोणतीही दंडात्मक कारवाई करण्याची स्पष्ट कायदेशीर तरतूद नाही. त्यामुळे कामगारांचे संरक्षण हे बहुतांश ठिकाणी मालकांच्या इच्छेवर अवलंबून राहते.

**नवीन कामगार संहितेतही उष्णतेकडे दुर्लक्ष**

केंद्र सरकारने लागू केलेल्या व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या परिस्थिती संहिता (OSHWC Code) मध्ये औद्योगिक सुरक्षेवर भर देण्यात आला असला, तरी कामाच्या ठिकाणी कमाल तापमान किती असावे, विश्रांतीची सक्ती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता किंवा उष्णतेमुळे काम थांबविण्याचे निकष याबाबत कोणतेही स्पष्ट आणि बंधनकारक नियम करण्यात आलेले नाहीत.

यामुळे प्रचंड तापमानातही अनेक ठिकाणी कामगारांना काम सुरू ठेवण्यास भाग पाडले जात असल्याची वस्तुस्थिती आहे.

**'हीट ॲक्शन प्लॅन'मध्येही कामगार दुय्यम**

अनेक राज्यांनी हीट ॲक्शन प्लॅन्स (HAPs) तयार केले असले तरी त्यांचा भर मुख्यतः आपत्ती व्यवस्थापन आणि नागरिकांना सूचना देण्यावर आहे. उन्हामुळे काम थांबविल्यास कामगारांचे वेतन अबाधित राहील, विश्रांती मिळेल किंवा सुरक्षित कामकाजाची हमी मिळेल, अशी कोणतीही कायदेशीर तरतूद या आराखड्यांमध्ये नाही.

**दर दहा पैकी नऊ कामगार उष्णतेने त्रस्त**

उष्णतेचा सर्वाधिक फटका बांधकाम, शेती, रस्ते आणि असंघटित क्षेत्रातील मजुरांना बसत आहे. विविध पाहण्यांनुसार, कारखान्यांतील दर दहा पैकी नऊ कामगारांना वाढत्या उष्णतेचा थेट त्रास होत आहे. उष्माघात, निर्जलीकरण, थकवा आणि कार्यक्षमता घटणे यांसारख्या समस्या सातत्याने वाढत आहेत.

**अर्थव्यवस्थेलाही मोठा धोका**

तज्ज्ञांच्या मते, वाढत्या उष्णतेमुळे कामगारांची उत्पादकता झपाट्याने कमी होत आहे. उष्णतेपासून संरक्षणासाठी बंधनकारक नियम लागू करण्यात अपयश आल्यास २०३० पर्यंत भारताच्या सकल देशांतर्गत उत्पन्नाला (GDP) सुमारे ४.५ टक्क्यांचा फटका बसू शकतो. म्हणजेच हा प्रश्न केवळ कामगारांच्या आरोग्यापुरता मर्यादित नसून देशाच्या अर्थव्यवस्थेलाही मोठे नुकसान पोहोचवू शकतो.

**प्रश्न थेट सरकारलाच**

दरवर्षी विक्रमी उष्णतेचे इशारे दिले जात असताना, कामगारांच्या सुरक्षिततेसाठी सक्तीचे कायदे का नाहीत? उष्णतेमुळे होणारे मृत्यू आणि आजार टाळण्यासाठी केवळ मार्गदर्शक सूचना पुरेशा आहेत का? आणि देशाची अर्थव्यवस्था उष्णतेच्या संकटामुळे हादरण्याची वेळ येण्यापूर्वी सरकार कामगारांसाठी कठोर कायदेशीर संरक्षण देणार का, हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.

# चिकन बिर्याणी खाणे गुन्हा नाही; मतभेदांची जागा आकुंचन पावत आहे' ' न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांची तीव्र चिंता

### अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि वैयक्तिक स्वातंत्र्य धोक्यात; आंदोलक विद्यार्थी, जामीन प्रक्रिया आणि गुन्हेगारीकरणाच्या वाढत्या प्रवृत्तीवर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचे परखड भाष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारतामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीतील मतभेद व्यक्त करण्याची जागा सातत्याने संकुचित होत असल्याची गंभीर चिंता सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी व्यक्त केली आहे. भोपाळ येथील नॅशनल लॉ इन्स्टिट्यूट युनिव्हर्सिटी (छङखण) येथे आयोजित व्याख्यानात बोलताना त्यांनी किरकोळ घटनांचे गुन्हेगारीकरण, जामीन प्रक्रियेत होणारा विलंब आणि आंदोलकांवर लादल्या जाणाऱ्या कठोर निर्बंधांवर परखड भाष्य केले.

**'चिकन बिर्याणी खाणे गुन्हा असू शकत नाही'**

वाराणसीमध्ये गंगा नदीवरील बोटीत इफ्तार पार्टीदरम्यान चिकन बिर्याणी खाल्ल्याच्या आरोपावरून १४ विद्यार्थ्यांना जवळपास तीन महिने तुरुंगात ठेवण्यात आले, या घटनेचा उल्लेख करत न्यायमूर्ती भुयान म्हणाले,

गंगा नदीवर चिकन खाण्यास मनाई करणारा कोणताही कायदा नाही. बिर्याणी खाणे हा गुन्हा असू शकत नाही.

अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये नागरिकांना दीर्घकाळ जामीन नाकारला जाणे ही न्यायव्यवस्थेसाठी चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

**शांततापूर्ण आंदोलन करणारे विद्यार्थीही तुरुंगात**

देशात स्वतःच्या हक्कांसाठी शांततापूर्ण आंदोलन किंवा निषेध करणाऱ्या विद्यार्थ्यांवरही गुन्हे दाखल करून त्यांना तुरुंगात पाठवण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे न्यायमूर्ती भुयान यांनी सांगितले. लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलन हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार असल्याची आठवण त्यांनी करून दिली.

**जामीन मिळाला तरी कठोर निर्बंध**

जामीन मंजूर झाल्यानंतरही आंदोलकांवर पासपोर्ट जमा करणे, सोशल मीडियाचा वापर न करण्याची अट, सार्वजनिक सभा किंवा आंदोलनात सहभागी होण्यास मनाई अशा कठोर अटी लादल्या जात असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

या अटींमुळे नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्यावर अनावश्यक मर्यादा येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

**'मतभेद हे लोकशाहीचे प्राण'**

मतभेद (ऌीशपीं), वादविवाद आणि शांततापूर्ण निषेध हा लोकशाहीचा आत्मा आहे, असे स्पष्ट करत न्यायमूर्ती भुयान यांनी विविध मतांना स्थान देणे ही लोकशाहीची मूलभूत गरज असल्याचे सांगितले. मात्र, देशात वेगवेगळ्या विचारांना सामावून घेण्याची क्षमता कमी होत चालल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली.

त्यांच्या या वक्तव्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, नागरिकांचे अधिकार आणि न्यायव्यवस्थेची भूमिका या विषयांवरील चर्चेला पुन्हा एकदा चालना मिळाली आहे.

# संपादकीय

## रस्त्यावरचे आंदोलन' ते 'मोबाईलवरील क्रांती' बदलत्या भारतातील विद्यार्थी शक्ती

भारतातील विद्यार्थी आंदोलने ही नवीन गोष्ट नाही. स्वातंत्र्य चळवळीपासून ते मंडल आयोग, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन, नागरिकत्व कायद्यावरील आंदोलन अशा अनेक टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी इतिहासाला दिशा दिली आहे. मात्र आजची पिढी वेगळी आहे. तिच्या हातात केवळ निषेधाचे फलक नाहीत, तर स्मार्टफोन आहे. तिचे व्यासपीठ केवळ रस्ते नाहीत, तर सोशल मीडिया आहे. त्यामुळे आजचे आंदोलन केवळ एका शहरापुरते मर्यादित राहत नाही, तर काही मिनिटांत संपूर्ण देशात पोहोचते.

परीक्षेतील कथित प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांविरोधात दिल्लीत सुरू झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने याच बदलत्या वास्तवाची प्रचिती दिली आहे. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांमध्ये आहे. परीक्षा म्हणजे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णायक टप्पा असतो. अशा वेळी प्रश्नपत्रिका फुटीच्या घटना घडल्यास केवळ परीक्षा रद्द होत नाही, तर विद्यार्थ्यांच्या परिश्रमांवर, मानसिक आरोग्यावर आणि भविष्यावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे अशा प्रश्नांवर विद्यार्थी रस्त्यावर उतरले, यात आश्चर्य नाही.

या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सोशल मीडियाचा वापर. आंदोलनातील व्हिडिओ, छायाचित्रे, प्रत्यक्ष अनुभव आणि प्रतिक्रिया काही क्षणांत लाखो लोकांपर्यंत पोहोचल्या. आंदोलनाचे समर्थक असोत किंवा विरोधक, दोघांनीही डिजिटल माध्यमांचा वापर करून आपापली भूमिका मांडली. त्यामुळे माहितीवर एका बाजूचे वर्चस्व राहिले नाही. सरकार, विरोधक, माध्यमे आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवादाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे.

मात्र सोशल मीडियाची ही ताकद जितकी प्रभावी आहे, तितकीच ती धोकादायकही ठरू शकते. संपादित व्हिडिओ, अपूर्ण माहिती, अफवा, दिशाभूल करणारे संदेश आणि ट्रोल संस्कृती यामुळे वास्तव आणि प्रचार यातील सीमारेषा धूसर होतात. त्यामुळे कोणत्याही व्हायरल माहितीवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिची पडताळणी करणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे असले तरी त्यासोबत तथ्यांची जबाबदारीही तितकीच आवश्यक आहे.

सरकारसमोरही या आंदोलनाने काही मूलभूत प्रश्न उभे केले आहेत. प्रश्नपत्रिका फुटी रोखण्यासाठी कठोर कायदे करणे पुरेसे नाही. परीक्षाप्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा आणि दोषींवर वेळेत कारवाई ही तितकीच आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळवणे हे कोणत्याही सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान असते.

दुसरीकडे, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनीही संविधानाने दिलेल्या शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकाराचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. हिंसा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा द्वेषपूर्ण प्रचार यामुळे कोणत्याही आंदोलनाची नैतिक ताकद कमी होते. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आणि कायद्याचे पालन या दोन्ही गोष्टी एकत्र नांदल्या पाहिजेत.

आजची 'जनरेशन झेड' केवळ सोशल मीडियावर मनोरंजन करणारी पिढी नाही, तर डिजिटल माध्यमांचा वापर करून प्रश्न विचारणारी, पुरावे जतन करणारी आणि सार्वजनिक चर्चेला दिशा देणारी पिढी म्हणून पुढे येत आहे. ही बाब भारतीय लोकशाहीसाठी सकारात्मक ठरू शकते, जर संवाद, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या मूल्यांना त्याची जोड मिळाली तर.

विद्यार्थ्यांचा आवाज दाबून प्रश्न सुटत नाहीत, तसेच केवळ डिजिटल ट्रेंड निर्माण करूनही व्यवस्था बदलत नाही. विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था, उत्तरदायी शासन, जबाबदार नागरिक आणि संयमी लोकशाही संवाद या चार स्तंभांवरच शिक्षण व्यवस्थेचे भविष्य उभे राहील. भारतातील विद्यार्थी आंदोलनांनी आता रस्त्याबरोबरच मोबाईलच्या स्क्रीनवरही आपली जागा निर्माण केली आहे. या नव्या वास्तवाकडे सरकार, समाज आणि शिक्षण व्यवस्था यांनी संघर्ष म्हणून नव्हे, तर सुधारणा करण्याची संधी म्हणून पाहण्याची गरज आहे.

# ८०० बालवारकऱ्यांचे नयनरम्य रिंगण; सहावीच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासपूर्ण कीर्तन

### आषाढी एकादशी निमित्त माइलस्टोन स्कूलच्या मैदानावर अवतरली 'पंढरी'; तीन शाखांच्या संयुक्त ग्रंथदिंडीने रंगला भक्तिमय सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त बीड शहरातील माइलस्टोन इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात शनिवारी (२५ जुलै) भक्ती, संस्कार आणि भारतीय परंपरेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. टाळ-मृदुंगाचा गजर, ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात तब्बल ८०० बालवारकऱ्यांनी साकारलेले भव्य रिंगण, तीन शाखांच्या संयुक्त ग्रंथदिंडीचा उत्साह आणि सहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले अभ्यासपूर्ण कीर्तन यामुळे संपूर्ण परिसर जणू प्रति-पंढरपूर बनल्याचे चित्र पाहायला मिळाले.

माइलस्टोन इंटरनॅशनल स्कूलच्या विस्तीर्ण मैदानावर आयोजित या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून भक्तिमय वातावरण निर्माण केले. कपाळावर बुक्का, हातात भगव्या पताका, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या मुली आणि विठ्ठल-रुक्मिणी तसेच संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांचा शिस्तबद्ध सहभाग आणि उत्साह पाहून पालकांसह सर्व उपस्थित भारावून गेले.

हा भव्य सांस्कृतिक सोहळा माइलस्टोन संस्थेच्या उपाध्यक्षा नम्रता भानुसे, सचिव ज्ञानेश्वर तांबे आणि मुख्याध्यापिका सारिका जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तीनही शाखांतील शिक्षक, सहशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



**तीन शाखांची संयुक्त ग्रंथदिंडी ठरली आकर्षण**

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे माइलस्टोनच्या तळेगाव, कालिका नगर आणि डी.पी. रोड या तीनही शाखांतील विद्यार्थ्यांची संयुक्त ग्रंथदिंडी. सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीत सहभाग घेतला. हरिनामाच्या अखंड गजरात विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानावर साकारलेले विशाल गोलाकार रिंगण आणि त्यामधील दिंडी नृत्य उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरले.

**सहावीच्या विद्यार्थ्यांचे प्रगल्भ कीर्तन**

कार्यक्रमातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले अभ्यासपूर्ण कीर्तन. मराठी शिक्षिका जयश्री राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तेजस नरवडे, मल्हार खटाने, अंश नवसागर, जयेश जाधव, सर्वेश जमदाडे, सिद्धार्थ काळे आणि अक्षद बनकर या विद्यार्थ्यांनी संत तुकाराम महाराजांच्या बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले या अभंगावर अत्यंत प्रभावी निरूपण केले. इतक्या लहान वयात विद्यार्थ्यांनी केलेली प्रगल्भ मांडणी आणि कीर्तन सेवा पाहून उपस्थित पालक, शिक्षक आणि मान्यवरांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि नैतिक मूल्यांचे संस्कार रुजविण्याच्या दृष्टीने शाळेचा हा अभिनव उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला.

आषाढी एकादशीचा हा भक्तिमय सोहळा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न ठरता विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संत साहित्य आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# कचऱ्याच्या समस्येवरून प्रभाग १६ मधील लोकप्रतिनिधी आक्रमक; पीसीएमसी प्रशासनाला तीव्र आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड:पिंपरी-चिंचवड महानगरपालिका **(PCMC)** क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १६ मध्ये कचरा संकलन आणि व्यवस्थापनाचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. या वाढत्या समस्येची दखल घेत स्थानिक नगरसेविका सौ. रेश्मा बापूजी कातळे आणि सामाजिक कार्यकर्ते बापू दिनकर कातळे यांनी पालिका प्रशासनाला तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.आरोग्याचा प्रश्न गंभीर; नागरिकांमध्ये तीव्र संतापप्रभागातील अनेक भागांमध्ये कचरा गाड्या वेळेवर येत नसल्याने ठिकठिकाणी कचऱ्याचे मोठे ढीग साचले आहेत. यामुळे परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, स्थानिक रहिवाशांमधून पालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.प्रशासनाला दिलेल्या प्रमुख सूचना व मागण्या:प्रभागातील साचलेला कचरा नियमितपणे आणि वेळेवर उचलण्यात यावा.संपूर्ण परिसरात तातडीने विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात यावी.कचरा व्यवस्थापन सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ आणि कचरा वाहने उपलब्ध करावीत.'स्वच्छ परिसर हा नागरिकांचा हक्क'या पार्श्वभूमीवर बोलताना नगरसेविका सौ. रेश्मा कातळे म्हणाल्या, ''स्वच्छ आणि निरोगी परिसर मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. स्वच्छतेच्या कामात कसलीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. नागरिकांना दर्जेदार सेवा मिळेपर्यंत आम्ही सातत्याने पाठपुरावा करू.''तर, सामाजिक कार्यकर्ते बापू दिनकर कातळे यांनी नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित करताना प्रशासनाला खडे बोल सुनावले. ''कचरा व्यवस्थापन ही केवळ महापालिकेची जबाबदारी नसून नागरिकांचाही यात सहभाग हवा. परंतु, प्रशासनाने आपली प्राथमिक जबाबदारी वेळेत पार पाडणे गरजेचे आहे,'' असे ते म्हणाले.आंदोलनाचा पवित्रामहापालिका प्रशासनाने या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास आणि वेळेत ठोस पावले न उचलल्यास, स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशाराही यावेळी कातळे यांनी प्रशासनाला दिला आहे.

# पीएमपीएमएल ही ठेकेदाराच्या फायद्यासाठी चालवली जाते का?

## महानगरपालिका महासभेत नगरसेवकांचा प्रशासनावर जोरदार हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) भोंगळ कारभारावर आणि प्रशासकीय अनास्थेवर पुणे महानगरपालिकेच्या महासभेत सर्वपक्षीय नगरसेवकांनी जोरदार आसूड ओढले. पीएमपीएमएल ही संस्था नेमकी प्रवाशांच्या सोयीसाठी चालवली जात आहे की खासगी ठेकेदारांच्या फायद्यासाठी? असा उपरोधिक सवाल उपस्थित करत सत्ताधारी भाजपसह विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.

पुणे महापालिकेच्या सभागृहात पीएमपीएमएलला द्यावयाच्या आर्थिक अनुदानासंदर्भात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नगरसेवकांनी बसस्थानकांची झालेली दुर्दशा, पीएमपीएमएलची सातत्याने वाढणारी आर्थिक तूट, भाडेतत्त्वावरील भूखंडांचा अपारदर्शक कारभार, तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या पेन्शनचा प्रश्न यांवर प्रशासनाला जाब विचारला. याशिवाय अनुकंपा तत्त्वरील रखडलेली भरती, पदोन्नतीमधील गैरव्यवहार, जुन्या बॅटरींची किरकोळ किमतीत झालेली विक्री आणि गाड्यांच्या देखभाल-दुरुस्तीतील अनियमितता यांसारख्या गंभीर मुद्द्यांकडे नगरसेवकांनी लक्ष वेधले.

**ठेकेदारांच्या बसेसचे प्रमाण ५० टक्क्यांच्या पुढे**

माजी महापौर प्रशांत जगताप, सुनील शिंदे यांच्यासह अनेक सदस्यांनी सभागृहात मुद्दा उपस्थित केला की, नियमानुसार संचलनात भाडेतत्त्वावरील बसेसचे प्रमाण २५ टक्के असणे अपेक्षित असताना ते ५० टक्क्यांच्या पुढे गेले आहे. पीएमपीएमएलच्या स्वतःच्या बसेसपेक्षा ठेकेदारांच्या बसेस रस्त्यावर अधिक धावत असल्याने ठेकेदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा थेट आरोप नगरसेवकांनी केला.

**'वन नेशन, वन कार्ड' आणि सोलर प्रकल्पाच्या चौकशीची मागणी**

भाजप नगरसेवक रविंद्र साळेगावकर यांनी सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी मेट्रो आणि पीएमपीएमएलसाठी 'वन नेशन, वन कार्ड'च्या धर्तीवर एकच 'इंटिग्रेटेड मोबिलिटी कार्ड' सुरू करण्याची मागणी केली. तसेच न. ता. वाडी डेपो येथील १ कोटी रुपयांचा सोलर प्रकल्प देखभालीअभावी बंद असल्याने झालेल्या नुकसानीची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी सभागृहात लावून धरली.

# शिरूर लोकसभा निवडणूक लढणारच; विद्यमान खासदारांनी विकासकामांचा हिशोब द्यावा : शिवाजीराव आढळराव पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर । प्रतिनिधी**

आगामी शिरूर लोकसभा निवडणूक आपण निश्चितपणे लढणार असल्याची स्पष्ट घोषणा म्हाडाचे अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केली. मागील काही वर्षांत शिरूर लोकसभा मतदारसंघात ६०० कोटी रुपयांहून अधिक विकासकामे मार्गी लावली, असा दावा करत त्यांनी सलग दोन कार्यकाळ खासदार राहिलेल्या विद्यमान लोकप्रतिनिधींनीही आपल्या विकासकामांचा जनतेसमोर हिशोब द्यावा, असे आव्हान दिले.

शिरूर येथे पत्रकार परिषदेत बोलताना आढळराव पाटील म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत चाकण, आळंदी, जुन्नर, राजगुरूनगर, शिरूर आणि मंचर येथील नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी कोट्यवधी रुपयांची विकासकामे मंजूर करून ती मार्गी लावण्यात आली. नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत विकासाची गती कायम ठेवण्याचा प्रयत्न केला असून, भविष्यातही विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी प्रलंबित पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवरही भाष्य केले. पुणे-शिरूर रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, तसेच नाशिक फाटा-राजगुरूनगर महामार्गाच्या कामाची कार्यादेश (वर्क ऑर्डर) त्वरित काढावी, अशी मागणी त्यांनी केली. चाकण-कुरळी-भोसरी मार्गावर अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने हा रस्ता तातडीने विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुणे-नाशिक रेल्वे मार्ग जुन्नर-खेड परिसरातून जावा, यासाठी आपण खासदार असताना सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता, अशी आठवणही त्यांनी करून दिली.

**डॉ. अमोल कोल्हेंवर टीका**

आढळराव पाटील यांनी विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावरही टीका केली. लोकसभा निवडणुकीत विमानतळ, चाकण वाहतूक कोंडी यांसारख्या प्रश्नांवर मते मागितली; मात्र निवडून आल्यानंतर हे विषय मागे पडले. इंद्रायणी मेडिसिटी प्रकल्पाचे पुढे काय झाले, याचे उत्तर जनतेला मिळायला हवे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

केवळ संसदेतील भाषणांचे सोशल मीडियावर प्रसारण करून जनतेचे प्रश्न सुटत नाहीत. भाषणांपेक्षा प्रत्यक्ष विकासकामे अधिक महत्त्वाची असतात, अशी टीकाही त्यांनी केली.

**गावागावांत संपर्क; हद्दवाढीची मागणी**

आगामी लोकसभा निवडणूक लढण्याचा पुनरुच्चार करत आढळराव पाटील म्हणाले की, मतदारसंघातील गावागावांत आपला सातत्याने संपर्क असून नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण कटिबद्ध आहोत.

शिरूर शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी शहराची हद्दवाढ ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. हद्दवाढ झाल्यास विकासकामांसाठी अधिक निधी उपलब्ध होऊन शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

# एक कोटीच्या दरोडा प्रकरणात कथित पत्रकार गजाआड; दोन पोलिसांसह सहा आरोपी फरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**निघोजे । प्रतिनिधी**

धायरी । प्रतिनिधी

खेड-शिवापूर पोलिस चौकीच्या हद्दीत घडलेल्या एक कोटी रुपयांच्या दरोडा प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत मुख्य सूत्रधार म्हणून संशयित असलेल्या एका कथित पत्रकाराला अटक केली आहे. या प्रकरणात दोन पोलिस कर्मचाऱ्यांसह एकूण सहा आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या संशयिताची ओळख आशिष तिवारी (वय २९, रा. धायरी) अशी असून, त्याला २७ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. तपासादरम्यान घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.

या प्रकरणात पोलिस दलातील दोन कर्मचाऱ्यांचा सहभाग समोर आल्याने खळबळ उडाली आहे. फरार आरोपींमध्ये राजगड पोलिस ठाण्याचे पोलिस नाईक अभिजित जाधव (वय ३२) आणि महिला पोलिस अंमलदार प्रमिला निकम (वय ४४) यांच्यासह इतर आरोपींचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले. संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमके काय घडले?

१८ जुलै रोजी व्यावसायिक हर्षवर्धन पवार आणि त्यांचे सहकारी किरण आपटे हे कारमधून एक कोटी रुपयांची रोकड घेऊन जात असताना आरोपींनी पोलिस असल्याचा बनाव करून त्यांची गाडी अडवली. त्यानंतर रोकड लुटण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र पवार यांनी प्रसंगावधान राखत प्रतिकार केल्यामुळे दरोड्याचा प्रयत्न फसला.

या प्रकरणात यापूर्वी विक्रम चाकणकर, अमित कोल्हे आणि गणेश रेश्मा वाघ यांना अटक करण्यात आली होती. आता कथित पत्रकारालाही अटक करण्यात आली असून एकूण चार आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत.

पोलिस तपासाला वेग

या गुन्ह्यात आतापर्यंत १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, उर्वरित सहा आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके कार्यरत आहेत. पोलिस दलातील कर्मचाऱ्यांचा सहभाग समोर आल्यानंतर या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली असून तपास अधिक वेगाने सुरू आहे.

**महाळुंगे: 'समर्थ ट्रॅव्हल्स'च्या नावाने उघडले बँक खाते; देशभरातील ३५ नागरिकांची १.३१ लाखांची सायबर फसवणूक!**

ठिकाण: बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा महाळुंगे, ता. खेड

घटना: आरोपी सुशांत रविंद्र सोये (वय २९, रा. खराबवाडी, खेड) व त्याच्या साथीदारांनी 'झारॲंह ढ्रॅंॲं अपव ढॲर्शिश्री' या नावाने बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये खाते उघडले. हे खाते सायबर गुन्हेगारांना वापरण्यास देऊन त्याद्वारे संपूर्ण भारतातील ३५ नागरिकांची १,३१,८८१ रुपयांची सायबर फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

कारवाई: महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात बीएनएस व माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये (खढ अर्ली) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तळेगाव दाभाडे: डिलिव्हरी टेम्पोमधील ७.७९ लाखांचे २४ मोबाईल अन् कॅमेरा ड्रायव्हरनेच लांबवला**

ठिकाण: डी.पी. रोड, यशवंत नगर, तळेगाव दाभाडे

घटना: फ्लिपकार्ट कंपनीला जोडलेल्या महिंद्रा लोडिंग गाडीचा (चक १४ ऋग ५८१४) चालक आरोपी चेतन तुकाराम सावंत (वय २५, रा. चाकण तळेगाव रोड) याने संगनमत करून गाडीतील तब्बल ७,७९,४०१ रुपयांचे २४ महागडे मोबाईल आणि १ कॅमेरा चोरी करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लांबवला.

कारवाई: तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दापोडी: जायका बिर्याणीसमोर फूटपाथवर सुरू असलेल्या बेकायदेशीर दारू विक्रीवर छापा**

ठिकाण: पुणे-मुंबई हायवे लगत, जायका बिर्याणीसमोर फूटपाथ, दापोडी

घटना: आरोपी हेमा विजय सोनवणे (वय ३६, रा. दापोडी) ही महिला विनापरवाना बेकायदेशीरपणे ५,७६० रुपये किमतीची देशी-विदेशी कंपनीची दारू बाळगून विक्री करत असताना मिळून आली.

कारवाई: दापोडी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**निगडी: माझ्यासोबत राहायला चल म्हणत महिलेला अन् तिच्या बहिणीला अमानुष मारहाण**

ठिकाण: पद्मा शेड, संग्राम नगर झोपडपट्टी, अंकुश चौक, निगडी

घटना: ओळखीचा आरोपी पांडुरंग चंद्रकांत जाधव (वय २८, रा. वाडरवाडी, शिवाजीनगर) याने तक्रारदार महिलेला माझ्यासोबत राहायला चल असा तगादा लावला. तिने नकार दिला असता, त्याने चिडून तक्रारदार व तिच्या बहिणीला हाताने-नखाने ओरबाडून, कपाळ जमिनीवर आपटून आणि लाकडी दांडक्याने जबर मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली.

कारवाई: निगडी पोलिसांनी आरोपी पांडुरंग जाधवला अटक केली आहे.

**देहूरोड: बँक खात्याचा गैरवापर करत १.२२ लाखांची सायबर फसवणूक**

ठिकाण: बँक ऑफ महाराष्ट्र, देहूगाव

घटना: आरोपी पियुष उमेश जामदार (वय १९, रा. तळेगाव दाभाडे) याने संघटीत सायबर गुन्हेगारी टोळीशी संगनमत करून स्वतःचे बँक खाते वापरण्यास दिले. त्याद्वारे १,२२,१०६ रुपयांचा सायबर आर्थिक व्यवहार करून एटीएमद्वारे ६०,००० रुपये काढून फसवणूक केली.

कारवाई: देहूरोड पोलीस ठाण्यात बीएनएस व माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये (खढ अर्ली) गुन्हा दाखल.

**संत तुकारामनगर: वास्तू उद्योग सोसायटीसमोरून दुचाकी लांबवली**

ठिकाण: फ्लॅट नं. ०१, अजोमरा, पिंपरी (जर्मन बेकरीसमोर)

घटना: अकील निजामुद्दीन अंसारी यांची १०,००० रुपये किमतीची काळ्या-निळ्या रंगाची सीडी डीक्स हिरो होंडा दुचाकी (चक १४ अठ ०५७१) अज्ञात चोराने लांबवली.

कारवाई: संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**भोसरी: पान टपरीवर अवैध देशी दारू अन् बंदी असलेला गुटखा जप्त**

ठिकाण: जय गणेश पान शॉप, विश्व विलास बिर्याणी हाऊसजवळ, भोसरी

घटना: स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे १,८९६ रुपये किमतीची देशी दारू तसेच शासनाने बंदी घातलेला सुगंधित गुटखा बाळगून विक्री करताना आरोपी आढळला.

कारवाई: भोसरी पोलिसांनी आरोपी वछंभरनाथ भोजदार यादव (वय ४५, मूळ रा. लातूर) याला अटक केली आहे.

**हिंजवडी: फोनवर बोलण्यावरून वाद, तरुणाच्या डोक्यात काठी मारून गंभीर दुखापत**

ठिकाण: रेनबो पीजी, शिंदेवस्ती, मारुंजी रोड

घटना: फोनवर बोलताना विचारणा केल्याच्या क्षुल्लक कारणावरून आरोपी आकाश सतीश सुरवसे (वय २१, रा. थेरगाव) व विष्णुकांत दयानंद अंधारे (वय २५, रा. मारुंजी) यांनी तक्रारदार रोशन गायकवाड (वय २१) याला शिवीगाळ करत लाकडी काठीने डोक्यात मारहाण करून गंभीर जखमी केले.

कारवाई: हिंजवडी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

**जेजुरी-मोरगाव रस्त्यावरील मोटार दुरुस्तीचे दुकान फोडले; ४२ हजारांच्या ५ पाणबुडी मोटारी लंपास**

जेजुरी : जेजुरी शहरातील जेजुरी-मोरगाव मार्गावरील एका मोटार दुरुस्तीच्या दुकानातून अज्ञात चोरट्याने ४२ हजार किमतीच्या एकूण ५ पाणबुडी मोटारी लांबवल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. दुकानाच्या मागील बाजूचा पत्र कापून चोरट्याने आत प्रवेश करत ही धाडसी चोरी केली.याप्रकरणी नितीन मनोहर कदम (रा. दौंडज, ता. पुरंदर) यांनी जेजुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कदम यांचे जेजुरी-मोरगाव रस्त्यालगत मोटार दुरुस्ती आणि वाइंडिंगचे दुकान आहे. २४ जुलै रोजी रात्री नेहमीप्रमाणे दुकान बंद करून गेल्यानंतर, २५ जुलै रोजी सकाळी जेव्हा ते दुकान उघडण्यासाठी आले, तेव्हा हा सर्व प्रकार उघडकीस आला.दुकानाच्या मागील बाजूचा पत्र कापलेला पाहून कदम यांनी तात्काळ आत जाऊन पाहणी केली. दरम्यान, दुकानात विक्री व दुरुस्तीसाठी ठेवलेली नामांकित 'टेक्समो' कंपनीची एक पाणबुडी मोटार आणि इतर चार पाणबुडी मोटारी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या चोरीमुळे परिसरात व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अजितदादा पवार जयंतीनिमित्त पीडीसीसी बँकेच्या ८.५०% व्याजदराच्या दोन विशेष बाँड योजना; ६ ऑगस्टपर्यंत गुंतवणुकीची संधी

**RBI मान्यतेने LTSB व PDI योजना सुरू; १० हजारांपासून गुंतवणूक, तिमाही व्याजाचा लाभ**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने (PDCC) लोकनेते दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त गुंतवणूकदारांसाठी ८.५० टक्के व्याजदराच्या दोन विशेष बाँड योजनांचा शुभारंभ केला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (RBI) मान्यतेने सुरू करण्यात आलेल्या या योजनांचा प्रारंभ सासवड येथील विभागीय कार्यालयात बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांच्या हस्ते करण्यात आला.

बँकेने लॉंग टर्म सबॉर्डिनेटेड बाँड्स (LTSB) आणि परपेच्युअल डेट इन्स्ट्रुमेंट्स (P|I) या दोन विशेष योजना बाजारात आणल्या आहेत. या दोन्ही योजनांमध्ये गुंतवणूकदारांना वार्षिक ८.५० टक्के दराने व्याज मिळणार असून, त्याचे वितरण दर तीन महिन्यांनी करण्यात येणार आहे.

या योजनांमध्ये २२ जुलै ते ६ ऑगस्ट २०२६ या मर्यादित कालावधीतच गुंतवणूक करता येणार आहे. गुंतवणुकीचा किमान कालावधी १० वर्षांचा असून, १० हजारांपासून गुंतवणूक सुरू करता येईल. त्यानंतर १० हजारांच्या पटीत इच्छेनुसार अधिक रक्कम गुंतवण्याची सुविधा उपलब्ध आहे. वैयक्तिक गुंतवणूकदारांना १० हजार ते १० लाखांपर्यंत बाँड्स खरेदी करता येणार आहेत.

या योजना केवळ वैयक्तिक गुंतवणूकदारांसाठीच नव्हे, तर विविध संस्थांसाठीही खुल्या करण्यात आल्या आहेत. आकर्षक व्याजदर, तिमाही व्याज वितरण आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचा पर्याय यामुळे या योजनांना गुंतवणूकदारांचा चांगला प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा बँकेने व्यक्त केली आहे. बँकेने इच्छुक गुंतवणूकदारांना ६ ऑगस्ट २०२६ पूर्वी आपल्या जवळच्या शाखेत संपर्क साधून या विशेष बाँड योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# डिंभे धरण ९०.२९ टक्के भरले; कुकडी प्रकल्पात ६७.५७ टक्के पाणीसाठा, तरीही धरणग्रस्त गावांचा पाणीप्रश्न कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**फलके/आंबेगाव, प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याचे जीवनवाहिनी मानले जाणारे हुतात्मा बाबू गेनू जलाशय अर्थात डिंभे धरण संततधार पावसामुळे ९०.२९ टक्के भरले असून कुकडी प्रकल्पातील एकूण पाणीसाठाही ६७.५७ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणातील वाढत्या जलसाठ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असले, तरी धरणग्रस्त गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मात्र अद्याप कायम असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.



पुणे व अहमदनगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या डिंभे धरणाची संकल्पना १९८७ मध्ये तत्कालीन कृषिमंत्री शरद पवार यांच्या पुढाकारातून साकार झाली. २००१ मध्ये धरणाचे काम पूर्ण झाले. धरणाची एकूण साठवण क्षमता १३.५० टीएमसी असून उपयुक्त पाणीसाठा १२.५० टीएमसी आहे. धरणाचे पाणलोट क्षेत्र २९८ चौरस किलोमीटर इतके आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिमेकडील सह्याद्री पर्वतरांगातील पाटण, बोरघर आणि आहुपे खोऱ्यातून मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी डिंभे धरणात येत असल्याने जलसाठ्यात वेगाने वाढ होत आहे. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहत असून भातखाचरेही तुडुंब भरली आहेत. मात्र अतिवृष्टीचा फटका आदिवासी भागातील शेतकऱ्यांना बसला आहे. अनेक ठिकाणी भातखाचरे वाहून गेली असून भात रोपांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे दहाड पेरणी उशिरा झाली, तर काही ठिकाणी उगवण कमी झाल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी तसेच पडझड झालेल्या बांधांची दुरुस्ती कृषी विभागामार्फत करावी, अशी मागणी शेतकरी व आदिवासी बांधवांकडून होत आहे.

**कुकडी प्रकल्पातील धरणांचा पाणीसाठा**

- * एकूण कुकडी प्रकल्प : ६७.५७ टक्के
- * येडगाव : ९०.४२ टक्के
- * माणिकडोह : ४८.०० टक्के
- * वडज : ८४.२७ टक्के
- * पिंपळगाव जोगा : ३३.४७ टक्के
- * डिंभे : ९०.२९ टक्के
- * विसापूर : ९२.२७ टक्के
- * चिलेवाडी : ७९.९५ टक्के
- * घोड : ९८.७९ टक्के

**डिंभे धरणामुळे बाधित गावे**

डिंभे धरणामुळे एकूण २३ गावे बाधित झाली आहेत. त्यापैकी ११ गावे पूर्णतः बाधित असून आंबेगाव, कळंबई, फुलवडे, कोलतावडे, मेघोळी, वचपे, दिगद, पांचाळे बुद्रुक, सावरली, कुशीरे खुर्द आणि महाळुंगे तर्फे आंबेगाव यांचा समावेश आहे. तर १२ गावे अंशतः बाधित असून बोरघर, पाटण, पिंपरी, जांभोरी, फलोदे, आंबडे, साकेरी, पोखरी, नानवडे, डिंभे बुद्रुक, पांचाळे खुर्द आदी गावांचा त्यात समावेश आहे.

## जारकरवाडीच्या तरुणांनी जपली आषाढी बारशीच्या अन्नप्रसादाची अनोखी परंपरा

**ग्रामस्थांच्या सहकार्याने अनेक दशकांपासून सेवाभाव, सामाजिक ऐक्य आणि धार्मिक संस्कृतीचा वारसा कायम**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील सर्वार्थाने प्रगतशील गाव म्हणून ओळख असलेल्या जारकरवाडी येथे आषाढी बारशीच्या निमित्ताने गावातील तरुणांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या अन्नप्रसादाच्या उपक्रमाने पुन्हा एकदा सामाजिक ऐक्य, सेवाभाव आणि धार्मिक परंपरेचा आदर्श घालून दिला. अनेक दशकांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा आजही तेवढ्याच उत्साहाने आणि श्रद्धेने जोपासली जात आहे.

यंदाही आषाढी बारशीचे औचित्य साधत गावातील तरुण मंडळ आणि ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने सर्व भाविक व ग्रामस्थांसाठी मिष्ठान्न भोजनाचा अन्नप्रसाद आयोजित करण्यात आला. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमात



महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती आणि बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत अन्नप्रसादाचा लाभ घेतला. या उपक्रमासाठी गावातील नागरिकांनी आर्थिक तसेच वस्तूरूपाने उत्स्फूर्त सहकार्य केले. अन्नप्रसादाची तयारी, नियोजन, भोजन व्यवस्था, स्वच्छता आणि भाविकांची सेवा अशा सर्व जबाबदाऱ्या गावातील तरुणांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनपूर्वक पार पाडल्या. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. आषाढी बारशीच्या निमित्ताने दरवर्षी आयोजित होणारा हा उपक्रम केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता गावातील सामाजिक ऐक्य, परस्पर सहकार्य आणि एकोप्याचे प्रतीक बनला आहे. नवीन पिढीनेही ही परंपरा जपण्याची जबाबदारी स्वीकारल्याने गावाच्या सांस्कृतिक वारशाला बळ मिळत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

गावातील तरुणांच्या पुढाकारातून समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याने जारकरवाडीचा हा अन्नप्रसाद सोहळा परिसरासाठी प्रेरणादायी ठरत असून, भविष्यातही ही सेवाभावी परंपरा अशीच अखंड सुरू राहावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## अवसरी खुर्दच्या वंडर किड्स प्री स्कूलमध्ये भक्तिमय दिंडी सोहळा; चिमुकल्यांनी जपली वारकरी परंपरा

**संतांच्या वेशभूषा, पालखी, रिंगण, फुगड्या आणि संस्कारमय नाटिकेने वेधले पालकांचे लक्ष**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

आषाढी वारीचे औचित्य साधत आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथील वंडर किड्स प्री स्कूलमध्ये दिंडी सोहळा भक्ती, संस्कार आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार आणि शिक्षणाचे महत्त्व यांचा सुंदर संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळाला.

स्कूलचे अध्यक्ष योगेश लिंगे आणि मुख्याध्यापिका शुभांगी लिंगे यांच्या हस्ते भैरवनाथ मंदिर चौकात माऊलींच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात चिमुकल्यांनी रिंगण घालत फुगड्या खेळल्या. त्यांच्या उत्साही सहभागाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

यावेळी ह.भ.प. अनंत महाराज टेंबेकर, शांताराम अभंग, मनोज काळदंते, बाळासाहेब गायकवाड, प्रसाद खोल्लम, सागर भोर, आनंदराव भोर पाटील, प्रसाद अभंग, पायी दिंडी सोहळ्याचे उपाध्यक्ष विठ्ठल शिंदे,



शारंगधर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई तसेच विठ्ठल-रुक्मिणी यांच्या आकर्षक वेशभूषा साकारल्या. चिमुकल्यांचा हा भक्तिमय आविष्कार पाहण्यासाठी पालकांनी मोठी गर्दी केली होती. गावातून काढण्यात आलेल्या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी माऊलींच्या पालखी विसाव्याच्या ठिकाणांचे फलक हातात घेऊन जनजागृती केली.

कार्यक्रमादरम्यान मोबाईलच्या वाढत्या वापराचे दुष्परिणाम, मुलांवर चांगले संस्कार करण्याची गरज आणि पालकांनी मुलांना पुरेसा वेळ देण्याचा संदेश देणारी प्रभावी नाटिका सादर करण्यात आली. उपस्थितांनी या सादरीकरणाचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्कूलचे समन्वयक दीपक टेंबेकर यांनी केले. शिक्षिका पुनम खेडकर, सुरेखा शिंदे, पूजा भोर, पूर्वा शिंदे, श्रुती भोर आणि राजश्री भोर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. पालखी सोहळ्याची सांगता बालचमुंना खाऊ वाटप करून करण्यात आली.

## खडकवाडीत आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची ग्रंथ दिंडी; 'वाचाल तर वाचाल'चा दिला संदेश

**ग्रंथ हेच गुरु संकल्पनेतून भक्ती, संस्कार आणि वाचन संस्कृतीचा अनोखा संगम**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने गावठाण अंगणवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळेच्या संयुक्त विद्यमाने आनंदवारी ग्रंथ दिंडी व पालखी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. भक्ती, संस्कार आणि वाचन संस्कृतीचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाने गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.

'ग्रंथ हेच गुरु' या संकल्पनेवर आधारित ग्रंथ दिंडीत विद्यार्थ्यांनी 'वाचाल तर वाचाल' हा समाजप्रबोधनाचा संदेश दिला. अभंग, गवळणी, भजन-कीर्तन आणि



हरिनामाच्या गजरात विठ्ठल-रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आदी संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या निनादात संपूर्ण गावातून दिंडी काढत भक्तिमय वातावरण निर्माण केले.

दिंडीदरम्यान गावातील सुवासिनींनी विठ्ठल-रुक्मिणी आणि संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे औक्षण करून पूजन केले. या ग्रंथ दिंडीस ज्ञानेश्वर भजनी मंडळाने विशेष सहकार्य केले.

यावेळी इयत्ता तिसरीतील विद्यार्थी कौस्तुभ बोऱ्हाडे याने सादर केलेल्या कीर्तनरूपी सेवेला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. लहान वयातच त्याने संतविचारांचा संदेश प्रभावीपणे मांडत उपस्थितांची मने जिंकली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करताना वारकरी परंपरेतील संस्कारही रुजविण्याचा उद्देश या उपक्रमामागे असल्याची माहिती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेखर सुक्रे यांनी दिली.

## देवशयनी एकादशीला आळंदीत हरिनामाच्या गजरात इंद्रायणी आरती; हजेरी मारुती मंदिरात माऊलींच्या पालखीचे विसाव्याचे दर्शन

**महापुरामुळे श्रीराम घाट मार्गे पालखीचे आगमन; कीर्तन, आरती व प्रसाद वितरणाने भाविकांना लाभली धार्मिक पर्वणी**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी, प्रतिनिधी**

देवशयनी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आळंदीतील इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समितीच्या वतीने हरिनामाच्या गजरात इंद्रायणी आरती उत्साहात संपन्न झाली. पावसामुळे इंद्रायणी नदीला महापूर आल्याने आवश्यक खबरदारी घेत धार्मिक कार्यक्रम पार पाडण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत एकादशीचा आध्यात्मिक उत्सव अनुभवला.

आरतीपूर्वी महिला साधकांनी आकर्षक रांगोळ्या काढत सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. त्यानंतर माऊलींची पालखी हरिनामाच्या जयघोषात श्रीराम घाट मार्गे हजेरी मारुती मंदिरात विसावली. मंदिरात युवा कीर्तनकार चक्रांकित महाराज



यांनी ग्रामप्रदक्षिणेदरम्यान कीर्तन सेवा सादर केली. कीर्तन आणि हरिनामाच्या गजराने मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

महापुराच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने घाटावर भाविकांना जाण्यास मनाई केली होती. त्यामुळे मोजक्या महिला भाविकांच्या उपस्थितीत इंद्रायणी आरती पार पडली. आरतीनंतर उपवासाचे पदार्थ आणि केळीचे वाटप करण्यात आले. हजेरी मारुती मंदिरात देवस्थानचे मानकरी, सेवेकरी आणि पालखीचे खांदेकरी ग्रामस्थांचा नारळ व प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. ग्रामस्थांनी परंपरेनुसार माऊलींची पालखी खांद्यावर घेत ग्रामप्रदक्षिणा पूर्ण केली. विविध ठिकाणी पालखीचे पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले. देवस्थानचे माजी विश्वस्त डॉ. सारंग जोशी यांच्यासह आळंदीकर ग्रामस्थांनी या सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# जारकरवाडी फाटा-लोणी-धामणी मार्गालगतची झाडे-झुडपे हटली; मात्र खड्ड्यांचे साम्राज्य कायम

### दृश्य स्पष्ट झाल्याने अपघाताचा धोका कमी; रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीची वाहनचालकांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी, प्रतिनिधी**

जारकरवाडी फाटा ते लोणी-धामणी या प्रमुख मार्गालगत वाढलेली झाडे आणि झुडपे संबंधित विभागाने अखेर हटविल्याने वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र, रस्त्यावरील ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे अद्यापही कायम असल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

खेड, आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर या चार तालुक्यांना जोडणारा हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून दररोज हजारो लहान-मोठी वाहने या रस्त्यावरून प्रवास करतात. भीमाशंकर सहकारी साखर कारखाना, नारायणगाव टोमॅटो बाजारपेठ, मंचर कृषी उत्पन्न बाजार समिती, रांजणगाव-शिक्रापूर एमआयडीसी तसेच अवसरी येथील अभियांत्रिकी महाविद्यालय, मंचर-घोडेगाव आयटीआय आणि बेल्हे येथील समर्थ गुरुकुलकडे जाण्यासाठीही हा प्रमुख संपर्क मार्ग आहे.

याशिवाय रांजणगाव गणपती, ओझर, लेण्याद्री आणि जेजुरी येथील खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या हजारो भाविकांचीही या मार्गावर वर्षभर वर्दळ असते. त्यामुळे या रस्त्याचे महत्त्व अधिक वाढले आहे.

रस्त्यालगतची झाडे व झुडपे हटविल्याने वळणांवरील दृश्य स्पष्ट झाले असून अपघाताचा धोका काही प्रमाणात कमी झाला आहे. मात्र, रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नाही आणि अपघाताचा धोका अधिक वाढत आहे.

स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी आणि प्रवाशांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार दुरुस्तीची मागणी करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे पावसाळा लक्षात घेऊन या मार्गावरील सर्व खड्डे तातडीने बुजवून रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



## सारांश वृत्त

### खेडेकर हॉस्पिटलमध्ये मोफत दंत व नेत्र उपचार केंद्राचा शुभारंभ; पुणेकरांना मिळणार दर्जे दार आरोग्यसेवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगरपालिकेच्या वतीने बोपोडी येथील कै. द्रोपदाबाई मुरलीधर खेडेकर हॉस्पिटलमध्ये मोफत दंत व नेत्र तपासणी व उपचार केंद्राचे उद्घाटन उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रामुळे नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत व दर्जे दार आरोग्यसेवा उपलब्ध होणार असून, सर्वसामान्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी हा महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे.

नवीन केंद्रामध्ये एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व उपचार सेवा सुरू करण्यात आली आहे. तसेच डी. वाय. पाटील डेंटल कॉलेज यांच्या सहकार्याने नागरिकांसाठी मोफत दंत तपासणी व उपचाराची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना दर्जे दार आरोग्यसेवा सहज आणि विनामूल्य उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

ही सुविधा अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी माजी उपमहापौर सुनीता परशुराम वाडेकर यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमात कै. बाबुराव शेवाळे दवाखान्यात लवकरच मोफत कॅन्सर केअर, डायग्नोस्टिक व सपोर्ट सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालयात अत्याधुनिक आयसीयू (खउण) बेडची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

या उद्घाटन सोहळ्यास माजी उपमहापौर सुनीता परशुराम वाडेकर, नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका भक्ती गायकवाड, नगरसेविका सपना छाजेड, पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर (खअड), आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे, रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. नितीन धमाले, पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. संतोष मराठे यांच्यासह विविध मान्यवर, आरोग्य तज्ज्ञ, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एल निनो, महागाई आणि तेलदरांचा धोका; तरीही अर्थसंकल्प सुरक्षित असल्याचा निर्मला सीतारामन यांचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

देशासमोर एल निनो, अनियमित मान्सून आणि जागतिक बाजारातील वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतीमुळे महागाईचा धोका निर्माण झाला असला, तरी केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात या संभाव्य संकटांचा सामना करण्यासाठी पुरेसे आर्थिक संरक्षण (ईीषषशआी) उपलब्ध असल्याचा दावा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी (२६ जुलै) केला.

सीतारामन यांनी स्पष्ट केले की, सध्याच्या टप्प्यावर केंद्र सरकारला २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील आकडेवारीत कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सरकारने संभाव्य आर्थिक धक्क्यांचा विचार करूनच अर्थसंकल्पाची आखणी केली असल्याने अतिरिक्त सुधारणा करण्याची गरज नसल्याचे त्यांनी सांगितले.

अर्थमंत्र्यांच्या मते, देशातील महागाईवर दोन प्रमुख घटकांचा प्रभाव आहे. एक म्हणजे जागतिक स्तरावर वाढणाऱ्या कच्च्या तेलाच्या किमती आणि दुसरा म्हणजे अनियमित मान्सून व एल निनोचा परिणाम. कमी पाऊस किंवा पावसाचे असमान वितरण झाल्यास शेती, पिकांचे उत्पादन, सिंचन व्यवस्था आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा प्रभावित होऊ शकतो. त्याचा थेट परिणाम अन्नधान्याच्या किमतींवर होऊन महागाई वाढण्याची शक्यता आहे. सीतारामन यांनी सांगितले की, सरकारने अशा संभाव्य परिस्थितीचा आधीच अंदाज घेत



अर्थसंकल्पात आवश्यक आर्थिक तरतुदी केल्या आहेत. त्यामुळे सध्या तरी अर्थसंकल्पातील महसूल, खर्च किंवा वित्तीय लक्ष्यांमध्ये बदल करण्याचा कोणताही विचार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर देशातील कृषी क्षेत्रासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास खरीप हंगाम, जलसाठे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दबाव वाढू शकतो. त्याचवेळी पश्चिम आशियातील भू-राजकीय तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यास इंधन, वाहतूक आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

अशा पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा अर्थसंकल्प कोणताही फेरबदल न करता कायम ठेवण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र आगामी काही महिन्यांत मान्सूनची स्थिती, अन्नधान्याचा पुरवठा, जागतिक तेलबाजारातील चढ-उतार आणि महागाईचा वेग यावर सरकारच्या आर्थिक धोरणांची खरी परीक्षा अवलंबून असेल.

## 'नारी शक्ती महोत्सव २०२६'ला उद्यापासून प्रारंभ; चिंचवडमध्ये तीन दिवस सांस्कृतिक पर्व

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने, समरसता साहित्य परिषद यांच्या सहकार्याने आणि आमदार उमाताई खापरे यांच्या पुढाकारातून 'नारी शक्ती महोत्सव २०२६' अंतर्गत २७ वा स्वरसागर सांस्कृतिक महोत्सव २७ ते २९ जुलैदरम्यान चिंचवड येथील रामकृष्ण मोरे नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. महिला सक्षमीकरण, भारतीय संस्कृती आणि कलाविष्काराचा संगम घडविणाऱ्या या महोत्सवात विविध सांस्कृतिक, संगीत, नृत्य आणि भक्तीपर कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे.

महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते होणार असून विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नारी शक्ती - समाज शक्ती - राष्ट्र शक्ती या संकल्पनेवर आधारित या महोत्सवातून महिलांच्या कर्तृत्वाचा, सर्जनशीलतेचा आणि सांस्कृतिक योगदानाचा गौरव केला जाणार आहे. सोमवार, २७ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भव्य भजनी सादरीकरण होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता नूपुर नृत्यालयतर्फे डॉ. सुमेधा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'नृत्य गाथा - भक्ती, शक्ती, संस्कृती' हा विशेष नृत्याविष्कार सादर होईल. सायंकाळी ७.३० वाजता सुप्रसिद्ध गायिका सावनी रवींद्र आणि सहकलाकार 'भाव सप्तक' यांचा 'सावन सरी' हा मराठी व हिंदी पावसाळी गीतांचा कार्यक्रम रंगणार आहे.

## 'हा काँग्रेसचा नाही, विद्यार्थ्यांचा विजय'; धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर हरियाणात 'विजय मार्च',

■ दैनिक राज्य लोकतंत्र

चंदीगड । वृत्तसंस्था

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर हरियाणा काँग्रेसने रविवारी (२६ जुलै २०२६) राज्यभरात 'विजय मार्च' काढत हा लाखो विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा विजय असल्याचा दावा केला. यावेळी काँग्रेसने नीटसह विविध स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीच्या मुद्द्यावर संसदेत केंद्र सरकारला जाब विचारण्याचा निर्धारही व्यक्त केला.

माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते भूपिंदर सिंह हुड्डा यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने प्रकरण संपलेले नाही. पेपरफुटीच्या घटनांसाठी जबाबदार कोण, विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून कसे काढणार आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सरकार कोणती ठोस पावले उचलणार, याबाबत संसदेत केंद्र सरकारकडून उत्तर मागितले जाईल. दरम्यान, भिवानी येथे हरियाणा प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राव नरेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखाली विजय मार्च काढण्यात आला. यावेळी त्यांनी हा विजय कोणत्याही राजकीय पक्षाचा नसून, आपल्या हक्कांसाठी शांततामय आणि लोकशाही मार्गाने लढलेल्या देशातील लाखो विद्यार्थ्यांचा असल्याचे म्हटले. विद्यार्थ्यांनी पारदर्शक आणि न्याय्य परीक्षा व्यवस्थेची मागणी करत सातत्याने आंदोलन केले आणि त्यातूनच सरकारला निर्णय घ्यावा लागल्याचा दावा त्यांनी केला. काँग्रेसने आरोप केला की, देशभरात वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. त्यामुळे केवळ मंत्र्यांचा राजीनामा पुरेसा नसून, संपूर्ण परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचे पक्षाने म्हटले आहे.

## ब्लॅक सी युद्धक्षेत्रात नोकरी स्वीकारण्यापूर्वी सावध राहा; केंद्र सरकारचा तातडीचा सुरक्षा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

रशिया-युक्रेन संघर्ष अधिक तीव्र होत असताना आणि अवघ्या एका आठवड्यात ब्लॅक सी परिसरातील दोन व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांमध्ये पाच भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर केंद्र सरकारने भारतीय नागरिकांसाठी महत्त्वाची सुरक्षा सूचना जारी केली आहे. रविवारी (२६ जुलै २०२६) जारी करण्यात आलेल्या या सल्ल्यात, संघर्षग्रस्त सागरी भागात, विशेषतः ब्लॅक सी परिसरात नोकरी स्वीकारण्यापूर्वी सुरक्षा परिस्थितीचे काळजीपूर्वक मूल्यांकन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या सल्ल्यानुसार, ब्लॅक सी आणि त्याला लागून असलेल्या सागरी क्षेत्रातील परिस्थिती अद्यापही अत्यंत अस्थिर आणि धोकादायक आहे. रशिया-युक्रेन युद्ध सुरू असल्याने व्यापारी जहाजांनाही हल्ल्यांचा धोका कायम असून, या भागात काम करणाऱ्या खलाशांनी आणि नोकरी स्वीकारू इच्छिणाऱ्या भारतीयांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी, असे सरकारने स्पष्ट केले आहे. ही सूचना अशा वेळी जारी करण्यात आली आहे, जेव्हा नुकतेच युक्रेनच्या ओडेसा बंदरात एमव्ही एजीएन रॅग्नार (चत अॠछ ठअॠछअठ) या मालवाहू जहाजावर क्षेपणास्त्र हल्ला झाला. त्या जहाजावर चार भारतीय खलाशी होते. त्यापैकी दोघे सुरक्षित असल्याची पुष्टी झाली असून, उर्वरित दोघांचा शोध सुरू असल्याची माहिती भारतीय दूतावासाने दिली आहे. सरकारने भारतीय नागरिकांना परदेशातील सागरी नोकरी स्वीकारण्यापूर्वी संबंधित देशातील सुरक्षा स्थिती, जहाजाचा मार्ग, नियोक्त्याची विश्वासार्हता आणि अधिकृत प्रवास सल्ले यांची पडताळणी करण्याचे आवाहन केले आहे.

विशेषतः युद्ध किंवा संघर्ष सुरू असलेल्या भागात केवळ आर्थिक संधी लक्षात घेऊन निर्णय न घेण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. ब्लॅक सी परिसरातील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर भारताचा हा इशारा महत्त्वाचा मानला जात आहे. युद्धाचा फटका आता केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित न राहता आंतरराष्ट्रीय व्यापारी जहाजे आणि त्यावरील विविध देशांच्या खलाशांपर्यंत पोहोचत असल्याचे या घटनांवरून स्पष्ट होत आहे.

भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असल्याचे केंद्र सरकारने म्हटले आहे.


## युक्रेनच्या ओडेसा बंदरावर भारतीय खलाशांसह मालवाहू जहाजावर हल्ला; दोघे सुरक्षित, दोघांचा अद्याप शोध सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लंडन/नवी दिल्ली । वृत्तसंस्था

युक्रेनमधील कृष्णासागर किनाऱ्यावरील महत्त्वाच्या ओडेसा बंदरावर शनिवारी (२५ जुलै २०२६) झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात भारतीय खलाशी असलेल्या एमव्ही एजीएन रॅग्नार **(MV AGN RAGNAR)** या मालवाहू जहाजाला फटका बसला. जहाजावर असलेल्या चार भारतीय नागरिकांपैकी दोघे सुरक्षित असल्याची पुष्टी झाली असून, उर्वरित दोघांबाबतची माहिती अद्याप मिळालेली नसल्याने शोध आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

या घटनेनंतर युक्रेनमधील भारतीय दूतावासाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून संबंधित युक्रेनियन प्रशासन आणि बचाव यंत्रणांशी सातत्याने संपर्कात असल्याचे सांगितले आहे. दूतावासाने जारी केलेल्या निवेदनानुसार, २५ जुलै रोजी ओडेसा बंदरात एमव्ही एजीएन रॅग्नार जहाजावर हल्ला झाला. जहाजावर चार भारतीय नागरिक



होते. त्यापैकी दोघे सुरक्षित असल्याची खात्री झाली आहे, तर उर्वरित दोघांची माहिती अद्याप प्रतीक्षेत आहे. शोध आणि बचाव मोहीम सुरू असून दूतावास संबंधित अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहे.

मात्र, जहाजावर नेमका कोणत्या बाजूकडून हल्ला करण्यात आला, याबाबत भारतीय दूतावासाने कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. त्यामुळे या घटनेची नेमकी पार्श्वभूमी अद्याप स्पष्ट झालेली नाही.

रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून कृष्णासागरातील व्यापारी जहाजांना सुरक्षा धोक्यांचा सातत्याने सामना करावा लागत आहे. ओडेसा हे युक्रेनचे महत्त्वाचे व्यापारी बंदर असून या परिसरात वारंवार हल्ल्यांच्या घटना घडत आहेत. अशा परिस्थितीत भारतीय खलाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, उर्वरित दोघा भारतीय नागरिकांची सुरक्षितता आणि बचाव मोहिमेच्या प्रगतीकडे भारत सरकार, त्यांच्या कुटुंबीयांसह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. भारतीय दूतावासाने परिस्थितीवर लक्ष ठेवत आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

## युद्धानंतर पर्यटनाला नवी झेप; २०२७ पर्यंत भारतातून इस्रायलला पर्यटकांची संख्या पूर्वपदावर आणण्याचे लक्ष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पणजी । वृत्तसंस्था

युद्धामुळे पर्यटन क्षेत्राला बसलेला मोठा फटका भरून काढण्यासाठी इस्रायलने भारतावर विशेष लक्ष केंद्रित केले असून, २०२७ पर्यंत भारतातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या युद्धपूर्व पातळीवर नेण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. मजबूत विपणन मोहीम, अधिक हवाई संपर्क, सुलभ व्हिसा प्रक्रिया आणि भारत-इस्रायलमधील वाढते द्विपक्षीय संबंध यांच्या बळावर हे उद्दिष्ट साध्य होईल, असा विश्वास इस्रायलच्या पर्यटन मंत्रालयाने व्यक्त केला आहे.

इस्रायल पर्यटन मंत्रालयाच्या मार्केटिंग संचालक अमृता बंगेरा यांनी शनिवारी (२५ जुलै २०२६) पणजी येथे पीटीआयशी बोलताना सांगितले की, कोविड-१९ महामारीनंतर इस्रायलमध्ये पर्यटन क्षेत्राने वेगाने पुनरुज्जीवन केले होते. मात्र त्यानंतर सुरू झालेल्या संघर्षामुळे हा वेग अचानक मंदावला आणि पर्यटन उद्योगाला मोठा धक्का बसला.

त्यांनी सांगितले की, भारतीय पर्यटक इस्रायलसाठी महत्त्वाची बाजारपेठ आहेत. त्यामुळे भारतात व्यापक प्रचार मोहीम राबविणे, विमानसेवा अधिक सुलभ करणे, व्हिसा प्रक्रिया जलद आणि सोपी करणे तसेच दोन्ही देशांमधील पर्यटन सहकार्य वाढविण्यावर भर दिला जात आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, भारत आणि इस्रायलमधील मजबूत राजनैतिक संबंध,




धार्मिक पर्यटन, ऐतिहासिक वारसा, वैद्यकीय पर्यटन आणि साहसी पर्यटनाची वाढती मागणी यामुळे भारतीय पर्यटकांची संख्या पुन्हा वाढण्याची अपेक्षा आहे. संघर्षानंतर सुरक्षा परिस्थिती सुधारताच पर्यटन उद्योगाला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

इस्रायलने गेल्या काही वर्षांत भारतीय पर्यटकांसाठी विशेष पर्यटन मोहिमा, प्रवास भागीदारी आणि पर्यटन व्यवसायांशी समन्वय वाढविला आहे. आता युद्धानंतर पुन्हा एकदा भारतीय पर्यटकांचा विश्वास संपादन करून पर्यटन क्षेत्राला गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, हवाई संपर्क वाढविणे, व्हिसा प्रक्रिया अधिक सुलभ करणे आणि सुरक्षिततेबाबत विश्वास निर्माण करणे ही उद्दिष्टे साध्य झाली, तर २०२७ पर्यंत भारत-इस्रायल पर्यटन संबंधांना नवसंजीवनी मिळण्याची शक्यता आहे.

# मतदार पडताळणीत अख चा 'रेड फ्लॅग'! बंगळुरूत तब्बल ६.४१ लाख विसंगती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बंगळुरू । वृत्तसंस्था

विशेष सघन मतदार यादी पुनरावलोकन (डशिलळरश्र खपींशपीळींश ठर्शींळीळेप - डखठ) प्रक्रियेदरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) तंत्रज्ञानाच्या मदतीने बंगळुरूमध्ये तब्बल ६.४१ लाख 'लॉजिकल डिस्क्रेपन्सीज' (तार्किक विसंगती) किंवा संभाव्य अनियमितता आढळल्याची माहिती प्रथमच अधिकृतपणे समोर आली आहे. मात्र, या विसंगती नेमक्या कोणत्या प्रकारच्या आहेत, याबाबत कोणतीही माहिती अद्याप सार्वजनिक करण्यात आलेली नाही. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत आणि अख च्या वापराबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

ग्रेटर बंगळुरू प्राधिकरणाने (ॠ्रशरींशी इशपसरर्श्रीी अीींहेीळीूं - ॠइअ) शनिवारी (२५ जुलै) सायंकाळी ४ वाजेपर्यंतच्या प्रगती अहवालात ही आकडेवारी जाहीर केली. त्यानुसार, आतापर्यंत केवळ ३८.८१ टक्के मतदार गणना फॉर्मचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. म्हणजेच, ६० टक्क्यांहून अधिक माहिती अद्याप डिजिटल प्रणालीत समाविष्ट झालेली नसताना लाखो विसंगती समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार, ६.४१ लाख विसंगतींपैकी २.६६ लाख प्रकरणे एकट्या बंगळुरू अर्बन जिल्ह्यात नोंदविण्यात आली आहेत. मात्र, या विसंगतींचे स्वरूप काय आहे, त्या डुप्लिकेट नोंदी आहेत का, चुकीचे पत्ते आहेत का, वयातील तफावत आहे का किंवा इतर कोणत्या निकषांवर अख ने त्यांना संशयास्पद ठरवले, याबाबत प्रशासनाने मौन बाळगले आहे.

याच मुद्द्यावरून आता अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. अख प्रणालीने केवळ संभाव्य विसंगती शोधल्या आहेत की त्या अंतिम अनियमितता मानल्या जाणार आहेत? या संशयित नोंदींची मानवी पडताळणी होणार का? चुकीची ओळख झाल्यास मतदारांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळणार का? या महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. विशेष सघन पुनरावलोकन प्रक्रिया ही मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी राबविली जात असली, तरी अख आधारित पडताळणीमुळे नागरिकांच्या अधिकारांवर परिणाम होणार नाही, याची खात्री करणे तितकेच आवश्यक असल्याचे निवडणूक प्रक्रियेचे अभ्यासक सांगतात. तंत्रज्ञानामुळे वेग आणि कार्यक्षमता वाढू शकते, परंतु अंतिम निर्णयासाठी मानवी पडताळणी आणि पारदर्शक प्रक्रिया अनिवार्य असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, प्रशासनाकडून या विसंगतींना लॉजिकल डिस्क्रेपन्सीज असे संबोधण्यात आले असून, त्याचा अर्थ थेट मतदार यादीतील फसवणूक किंवा बेकायदेशीर नोंदणी असा होत नाही. अशा विसंगतींमध्ये एकाच व्यक्तीच्या अनेक नोंदी, अपूर्ण माहिती, पत्ता किंवा वयातील तफावत, कुटुंबीयांच्या माहितीतील विसंगती अथवा इतर तांत्रिक त्रुटींचा समावेश असू शकतो. मात्र अधिकृत तपशील जाहीर न झाल्यामुळे विविध प्रकारच्या चर्चांना उधाण आले आहे.

राजकीय पातळीवरही या आकडेवारीचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. मतदार यादीतील अचूकता हा लोकशाही प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जातो. अशा परिस्थितीत लाखो विसंगतींचा दावा समोर येणे आणि त्याचवेळी त्याचे स्वरूप गोपनीय ठेवणे, या दोन्ही गोष्टींमुळे विरोधकांकडून पारदर्शकतेची मागणी अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. आतापर्यंत फक्त ३८.८१ टक्के फॉर्मचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असताना ६.४१ लाख संभाव्य विसंगती समोर आल्या आहेत. त्यामुळे उर्वरित सुमारे ६१ टक्के नोंदी डिजिटल झाल्यानंतर हा आकडा आणखी वाढणार की घटणार, याकडे आता निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवणाऱ्या सर्व घटकांचे लक्ष लागले आहे. अख आधारित पडताळणी हा भविष्यातील निवडणूक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग ठरू शकतो, मात्र त्यासाठी तितकीच पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा विश्वास टिकवणे ही प्रशासनासमोरील सर्वात मोठी कसोटी ठरणार आहे.